
# दैनिक अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | सोमवार, 18 मे 2026 | अंक क्र. 355 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# नागापूर-टोकवाडी रोडवरील विटभट्ट्या ठरतायत मृत्यूचा सापळा

## दुचाकी अपघातात परळी येथील संतोष गणपतराव गुट्टे यांचा दुर्दैवी मृत्यू!

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

■ नागापूर ते टोकवाडी रोडवर झालेल्या एका भीषण मोटारसायकल अपघातात संतोष गणपतराव गुट्टे (हल्ली मुक्काम थर्मल कॉलनी) यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मृत संतोष गुट्टे हे गंगाखेड येथील कुष्ठरोग विभागात कार्यरत होते, तर कनेरवाडी हे त्यांचे सासर होते. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून हळहळ व्यक्त होत आहे.

### प्रशासनाचे दुर्लक्ष आणि नियमबाह्य विटभट्ट्या!

■ मिळालेल्या माहितीनुसार, नागापूर ते टोकवाडी रोडवर सध्या मोठ्या प्रमाणावर विटभट्ट्या सुरू आहेत. यातील अनेक विटभट्ट्या शासन आणि पर्यावरण विभागाच्या कोणत्याही नियमांचे पालन न करता सर्रासपणे चालविल्या जात आहेत. विटभट्ट्यांच्या अवजड वाहनांमुळे रस्त्याची झालेली दुरवस्था आणि उडणारी धूळ यामुळे हा रस्ता वाहनधारकांसाठी अत्यंत धोकादायक बनला आहे.



### नागरिकांमध्ये तीव्र संताप

■ या भागातील नियमबाह्य विटभट्ट्यांकडे आणि रस्त्यांच्या दुरवस्थेकडे संबंधित प्रशासनाचे वारंवार दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे परळी आणि परिसरातील निष्पाप नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असून, आज एका शासकीय कर्मचाऱ्याला आपला जीव गमवावा लागला आहे. या अपघातानंतर अवैध विटभट्ट्यांवर आणि निष्काळजी प्रशासनावर कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.



### चौकशी आणि कडक कारवाईची मागणी

या अपघातातील दोषी गाडीचालक सध्या पोलिसांच्या रडारवर असून, त्याच्या वाहनाची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे. संबंधित वाहनाचा गाडी नंबर, फिटनेस प्रमाणपत्र आणि विमा पॉलिसी या सर्व कागदपत्रांची तातडीने तपासणी करून, नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असा सूर उमटत आहे. या अपघातातील दोषी गाडीचालक आणि मालक सध्या पोलिसांच्या रडारवर आहेत. मात्र, अशा प्रकरणांमध्ये गाडी मालक आणि चालक कायदेशीर कारवाईतून सुटण्यासाठी मूळ अपघातग्रस्त वाहन लपवून, त्या जागी सर्व कागदपत्रे वैध असलेली दुसरीच गाडी दाखवण्याची (वाहनाची आफ्रा-तफर करण्याची) दाट शक्यता असते, हा गंभीर मुद्दा नागरिकांनी उपस्थित केला आहे. परळी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागापूर ते टोकवाडी या मार्गावर अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले असून, या रस्त्याची अक्षरशः दुरवस्था झाली आहे. नुकत्याच घडलेल्या या अपघाताची माहिती मिळताच परळी ग्रामीण पोलिसांचे पोलीस उपनिरीक्षक सारोळे व जमादार मच्छिंद्र कप्पे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. या अपघातानंतर फरार झालेल्या अज्ञात वाहनाचा आणि त्याच्या चालकाचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

# परळी नगरपरिषदेच्या ढिसाळ कारभाराविरोधात आज राष्ट्रवादी काँग्रेसचे ढोल बजाव आंदोलन

## ढोल बजाव आंदोलनात सर्वांनी सहभागी व्हावे : महादेव गंगणे पाटील

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

**परळी नगरपरिषदेच्या ढिसाळ व जनविरोधी कारभाराच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) यांच्या वतीने शहरात आज ढोल बजाव आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील विविध विकासकामांमध्ये झालेल्या अनियमितता, निकृष्ट दर्जाची कामे तसेच नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांनी दिली असून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.**



या आंदोलनामध्ये नगरपरिषदेच्या विविध कामांची चौकशी करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. विशेषतः प्रभाग क्रमांक १५ व नवीन १६ नांदुरवेस परिसरातील सन २०१६ ते २०२५ दरम्यान झालेल्या विकासकामांची सविस्तर माहिती जाहीर करावी, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर कामांची चौकशी करावी, तसेच प्रधानमंत्री आवास योजना व रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांची यादी जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच नगरपरिषद कार्यालयातील फर्निचर खरेदीची माहिती, पालखी मार्गावरील अंबेवेस येथे सुरू असलेल्या पुलाच्या कामाची चौकशी तसेच शहरात "नमो उद्यान" उभारण्यात यावे, अशा विविध मागण्या आंदोलनाद्वारे करण्यात येणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी होणार असून, नगरपरिषद प्रशासनाने नागरिकांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे परळी शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांनी दिला आहे. तसेच ढोल बजाव आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.




# भारतासाठी दिलासादायक बातमी

## 20 हजार टन एलपीजी घेऊन सिमी जहाज सुरक्षितपणे कांडला बंदरात दाखल

■ मुंबई वृत्तसंस्था

पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. तब्बल २० हजार टन लिक्विफाइड पेट्रोलियम गॅस (एलपीजी) घेऊन येणारे 'सिमी' हे मालवाहू जहाज गुजरातमधील कांडला बंदरात रविवारी सुरक्षितपणे दाखल झाले.

पश्चिम आशियातील संघर्षामुळे सामुद्रिक मार्गांवर असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले असतानाही, या जहाजाने अत्यंत संवेदनशील आणि धोकादायक मानल्या जाणाऱ्या स्ट्रेट ऑफ होर्मुझ मार्गातून यशस्वीपणे प्रवास पूर्ण करत भारताचा किनारा गाठला. मार्शल आयलंड्सचा ध्वज असलेल्या या जहाजावर एकूण २१ क्रू मेंबर्स असून, त्यामध्ये ८ युक्रेनी आणि १३ फिलिपिनो नागरिकांचा समावेश आहे. पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे हा सागरी मार्ग सध्या अत्यंत संवेदनशील मानला जात आहे. या जहाजाच्या सुरक्षित आगमनामुळे भारताच्या एलपीजी पुरवठा साखळीला मोठा दिलासा मिळाला असून, ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने ही महत्त्वाची घडामोड मानली जात आहे.

# दुग्ध उत्पादन व्यवसायातून स्वयंरोजगार सुलभ निर्मिती : हरप्रीत सिंग

■ युवकांनी शेतकरी उद्योजक व्हावे : आ.सुरेश धस

■ आष्टी ( प्रतिनिधी)

दुग्ध उत्पादन व्यवसाय हा युवकांसाठी अतिशय सुलभ व्यवसाय असून स्वयंरोजगार निर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त आहे असे प्रतिपादन पंजाब येथील डेअरी फार्मर इन्फ्लुएंसर प्रशिक्षक आणि सल्लागार हरप्रीत सिंग यांनी केले. युवकांनी नोकरीच्या मागे न लागता दूध उत्पादन व्यवसायामध्ये नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून अत्याधुनिक पद्धतीने दुग्ध व्यवसाय करून शेती उद्योजक व्हावे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले. आष्टी येथील आष्टी तालुका दूध उत्पादक पुरवठा सहकारी संघ यांचे वतीने आयोजित पशुसंवर्धन व दूध उत्पादन वाढ मार्गदर्शन मेळाव्यामध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर आमदार सुरेश धस महानंद मुंबईचे संचालक रणजीत देशमुख भटिंडा पंजाब येथील दुग्ध व्यवसायिक आणि पशुखाद्य विशेषज्ञ संदीप सिंग आणि त्यांचे बंधू डेअरी फार्मर इन्फ्लुएंसर प्रशिक्षक आणि सल्लागार हरप्रीत सिंग उपस्थित होते

सुरुवातीस संदीप सिंग यांनी दुग्ध व्यवसायातील यशस्वीतेसाठी पशुखाद्य महत्त्वाचे असून गेली पंधरा वर्षे आपण संशोधन करून 67 किलो वजनाची कालवड निर्माण करण्यात यशस्वी झालो असून यापुढे आणखी संशोधन करणार आहोत पशुखाद्यामध्ये मुरघास हा महत्त्वाचा असून मका आणि प्रोटीन यावर भर देण्यात यावा दुधाळ गाय ज्यादा वजनाची होऊ नये याची काळजी घ्यावी कोरडा चारा देण्यात यावा कालवडीचे वयाप्रमाणे सहा महिने वजन वाढीप्रमाणे आहार देण्यात यावा कालवडींची जोपासना शास्त्रोक्त पद्धतीने केल्यास 13 ते 15 महिन्यात 350 किलो वजन प्राप्त करून कालवड गाभण करणे योग्य होते अशाप्रकारे नियोजन करण्यात यावे असे सांगितले आमदार सुरेश धस पुढे बोलताना म्हणाले आपण आष्टी तालुक्यातील सर्वात मोठा गाय गोठा केला असून त्या ठिकाणी अत्यंत शास्त्र प्रमाणे गाईंचे कालवडींचे संगोपन होत आहे तालुक्यातील शेतीला पर्याय म्हणून दूध उत्पादन हा सर्वोत्तम व्यवसाय असून युवकांनी नोकरीच्या मागे न लागता शेती उद्योजक व्हावे यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून दूध उत्पादन व्यवसायाकडे वळले पाहिजे दूध उत्पादकांनी जागरूक व्हावे पंजाब मध्ये लागवड केलेल्या गाई आणू नयेत कारण अत्यंत हलक्या दर्जाच्या गाई इकडे येत आहेत मुरघास निर्मिती करावी परंतु यापुढे भोतातला मुरघास वापरू नये करून या मुरघासामुळे स्तनदाह होत आहे त्यामुळे यापुढे जमिनीमध्ये तीन ताली




खोदून खाली गव्हाचे काड सोयाबीन तूर कडबा यापैकी वापरून त्यावर मुरघास करावा तसेच मुक्त गोठा तयार करून गाईंना सोड बांध बंद करा गाईंचे नुसते पोट भरू नका 12 ही महिने त्यांना मुरघासच द्यावा 80 टक्के मुरघास अधिक वीस टक्के सोयाबीन सरकी पाच टक्के असा खुराक देण्यात यावा कालवड संगोपनातून मोठ्या प्रमाणावर अर्थप्राप्ती होत आहे डब्ल्यू डब्ल्यू एस एबीएस आरमाडा ऑस्कर किंवा रँग्लर अशा चांगल्या पद्धतीचे दर्जेदार सिमेन वापरा जगात सर्वात जास्त होलस्टीन फ्रिजर या जातीच्या गायीपासून दूध निर्मिती केली जाते आम्ही लवकरच गाय तुमची कालवड आमची अशी योजना आणणार असून ती दूध उत्पादक शेतकऱ्यांना फायदेशीर आहे तसेच शासनाद्वारे लवकरच पाच गाईंचा गोठा अकरा लक्ष रुपये योजना सुरू करण्यात येणार आहे त्याचाही युवकांनी फायदा घ्यावा असे आवाहन करून उपस्थित दूध उत्पादकांपैकी माझ्याकडे 41 लिटर दूध देणारी गाय असून 42 लिटर तसेच 40 लिटर 35 लिटर दूध देणाऱ्या गाई मालकांचा सत्कार यावेळी करण्यात आला

हरप्रीत सिंग पुढे बोलताना म्हणाली की दुग्ध व्यवसाय हा व्यवसाय पद्धतीने केला पाहिजे डेरी फार्मिंग ही जीवनस्तर उंचावण्यासाठी सर्वोत्तम योजना असून छोट्या शेतकऱ्यांनी देखील चांगले तंत्रज्ञान वापरून अत्याधुनिक पद्धतीने दुग्ध व्यवसाय करावा उत्पादन वाढवावे या व्यवसायाचे विशेष म्हणजे अगदी छोट्या स्वरूपातून याचा हा व्यवसाय सुरू करता येतो नोकरीला हा पर्याय असून स्वयं रोजगार निर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त आहे दूध व्यवसायाला कधीही तुटवडा भासणार नाही दुधाला प्रचंड मागणी असून विना भेसळ दूध निर्मितीद्वारे युवकांनी रोजगार निर्माण करावा मार्गदर्शन करण्यासाठी आपल्या वेबसाईटवर सर्व माहिती उपलब्ध असून त्याद्वारे दूध उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येईल आमदार सुरेश धस यांचे कौतुक करताना ते म्हणाले की आम्ही दोन दिवस त्यांचे काम पाहत आहोत आणि ते देखील आमच्याकडे पंजाब मध्ये येऊन दूध उत्पादक शेतकऱ्यांना भेटले आहेत ते शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी प्रचंड मेहनती असलेले आमदार आहेत असे ते म्हणाले त्यावेळी बोलताना महानंद मुंबईचे संचालक रणजीत देशमुख म्हणाले की आमदार सुरेश धस हे केवळ मराठवाडा भूषण नसून ते महाराष्ट्र भूषण ठराविक इतके त्यांनी काम केलेले आहे हे अत्यंत कणखर आणि निर्भीड नेतृत्व असून हा दूध उत्पादन वाढ मेळावा हा ऐतिहासिक असून दूध व्यवसायास वेगळी दिशा मिळणारा हा दिवस असून बीड जिल्ह्याची ही दुसरी चांगली बाजू देखील महाराष्ट्राला पाहायला मिळणार आहे आमदार सुरेश धस हे अत्यंत अभ्यासू नेतृत्व असून दूध व्यवसाय विषयी त्यांचा दांडगा अभ्यास आहे दूध उत्पादकांची ते प्रभावी बाजू मांडताना आम्ही पाहिलेले आहे आष्टी सारख्या दुष्काळी तालुक्यात त्यांच्या मार्गदर्शनामुळेच मोठ्या प्रमाणावर दूध उत्पादन होत आहे असे सांगत दूध उत्पादकांना मार्गदर्शन दूध उत्पादकांनी आता बदल केला पाहिजे सर्वात महत्त्वाचे मुक्त संचार गोठा करावा मानसिकता बदलून हा शेतीचा जोड धंदा नव्हे तर एक उद्योग म्हणून याकडे पहावे दूध व्यवसाय करताना प्रत्येक हिशोब जमाखर्च देऊन ठेवा खर्च आणि उत्पादन याचा ताळमेळ ठेवा संगमनेर तालुक्यामध्ये आम्ही मिशन 50 लिटर असे धोरण ठेवले असून शेतकऱ्यांच्या दारात 50 लिटर दूध देणारी गाय उभी राहिली पाहिजे युरोपियन देशांमध्ये साठ लिटर्स देणारे गावी आहेत पंजाब मध्ये देखील आता 62 लिटर्स दूध देणारी गाय संदीप सिंग आणि हरप्रीत सिंग यांनी निर्माण केली आहे पंजाब मधील प्रदर्शनामध्ये 87 लिटर दूध देणारी गाय सध्या उपलब्ध असून पुढील दहा वर्षांनी आणखी वाढ होणार आहे गेली 25 वर्ष यामध्ये संशोधन झाले असून आम्ही देखील सहकारातून उत्तम पद्धतीने व्यवसाय करत आहोत चांगले सिमेन वापरून उत्तम कालवडी निर्माण करा पहिल्या दिवसापासून काळजी घ्या आजची कालवड उद्याची गाय आहे शास्त्रोक्त पद्धतीने पशुखाद्याचा आहार द्यावा आष्टी तालुक्यातील दूध उत्पादकांना आम्ही कधीही मार्गदर्शन आणि सहकार्य करण्यास तयार आहोत असे त्यांनी शेवटी सांगितले.यावेळी महानंद दूध महासंघ मुंबई संचालिका प्राजक्ताताई धस, राजहंस दुध संघ संगमनेरचे व्हा.चेअरमन.राजेंद्र चकोर राजहंस दुध संघ संगमनेरचे संचालक विक्रमराजे थोरात,विलासराव कवडे,डॉ. प्रमोद पावसे आष्टी तालुका दूध संघाचे चेअरमन शांतिलाल भोसले, व्हाइस चेअरमन अशोक गर्जे,मच्छिंद्र धनवडे,सभापती बद्रीनाथ जगताप,आत्माराम फुंदे, मोहन झांबरे,दिनकर दानी,गणेश मोकाशे,गोकुळ कोकणे, डॉ.संतोष शेळके,भरत सुळे,शिवाजी घोलप,माऊली जरांगे, डॉ.जालिंदर वांढरे,चंद्रकांत भोसले,या सह दूध संघाचे अधिकारी,पदाधिकारी,कर्मचारी वृंद तसेच दूध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

Last page

बीड, सोमवार, 18 मे 2026

# कडा प्रा.आ.केंद्रात 'राष्ट्रीय डेंग्यू दिन' संपन्न

## डास उत्पत्तीस्थाने नष्ट करावेत : वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी बोडखे - विधाते

### डेंग्यूची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय आणि गप्पी माशांच्या वापराविषयी कर्मचाऱ्यांना केले मार्गदर्शन

आष्टी (प्रतिनिधी)

पावसाळ्याच्या तोंडावर डेंग्यूसारख्या कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आरोग्य विभाग आतापासूनच सतर्क झाला आहे. याच पार्श्वभूमीवर, आष्टी तालुक्यातील कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात काल दि. १६ मे रोजी 'राष्ट्रीय डेंग्यू दिवस' मोठ्या उत्साहात आणि जनजागृतीपर कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. यावेळी परिसरातील नागरिकांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी डेंग्यू प्रतिबंध आणि उपाययोजनांबाबत उपस्थित आरोग्य कर्मचाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

**■ डेंग्यू टाळण्यासाठी जनजागृतीच मुख्य शस्त्र**

या विशेष कार्यक्रमात बोलताना वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी बोडखे- विधाते आणि वैद्यकीय अधिकारी डॉ.सिद्दिक बेग यांनी डेंग्यू आजाराविषयी सखोल माहिती दिली.डेंग्यू या आजाराची प्राथमिक लक्षणे कोणती, त्याचा प्रसार एडिस इजिप्ती डासांमार्फत कसा होतो आणि तो टाळण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, यावर त्यांनी प्रकाश टाकला.

"डेंग्यूचा डास हा साचलेल्या स्वच्छ पाण्यात अंडी घालतो. त्यामुळे घरातील आणि परिसरातील पाणी साठवणारी भांडी, उघडे टायर, नारळाच्या करवंट्या यामध्ये पाणी साचू न देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळावा असे आवाहन डॉ. शिवानी बोडखे-विधाते यांनी केले.




डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी साठवलेल्या मोठ्या पाण्याच्या टाक्या, विहिरी आणि डबक्यांमध्ये गप्पी माशांचा वापर करणे हा अत्यंत प्रभावी आणि नैसर्गिक उपाय आहे अशी माहिती डॉ.सिद्दिक बेग यांनी दिली.गप्पी मासे डासांच्या अळ्या खाऊन फस्त करतात, त्यामुळे डासांची पैदास नैसर्गिकरित्या थांबते असे त्यांनी स्पष्ट केले. याप्रसंगी प्रख्यात कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया तज्ज्ञ (सर्जन) डॉ.सुजित मसूरे यांनीही आपले विचार मांडले. आरोग्य कर्मचाऱ्यांनी ही माहिती केवळ स्वत:पुरती मर्यादित न ठेवता, ती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवावी. लोकांमध्ये डेंग्यूविषयी असलेली भीती दूर करून त्यांना योग्य ती काळजी घेण्यास प्रवृत्त करावे असे मार्गदर्शन डॉ.मसूरे यांनी केले.कडा प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व वैद्यकीय अधिकारी,आरोग्य कर्मचारी, परिचारिका आणि आशा सेविका या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.या मार्गदर्शनामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांच्या ज्ञानात भर पडली आहे.आगामी काळात डेंग्यूमुक्त परिसरासाठी जोमाने काम करण्याचा संकल्प सर्व उपस्थित कर्मचाऱ्यांनी यावेळी केला.

यावेळी प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी,आरोग्य निरीक्षक,आरोग्य सेवक आणि आरोग्य सेविका, बबन झगड, आकाश फरांडे, एम.बी.दुनघव, आर.एम.काळे,बी.के.झगडे,श्रीमती एल.यु.आत्राम, श्रीमती एस.बी. गायकवाड, श्रीमती जे.सी. शेळके,श्रीमती एन.व्ही.मोरे,पी.टी. देसाई,श्रीमती ए.बी. धस,ए.एन.परकाळे, श्रीमती व्ही.एम. गुरसाळी,श्रीमती जे.आर.दातीर,विनायक धोंडे, सय्यद नदीम, आयुब हे उपस्थित होते.

# बेल्हे येथे एसटी बस खोल खड्यात कोसळली; 25 प्रवासी थोडक्यात बचावले



पुणे | वृत्तसंस्था

कल्याण-अहिल्यानगर महामार्गावरील बेल्हे परिसरातील गुंजाळवाडी फाटा येथे रविवारी सायंकाळी एसटी बसचा अपघात झाला. भिवंडी डेपोची बस अचानक नियंत्रणाबाहेर जाऊन महामार्गालगतच्या खोल खड्यात कोसळली. या अपघातात चालक जखमी झाला असून बसमधील सुमारे २५ प्रवासी थोडक्यात बचावल्याची माहिती मिळाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अपघात इतका भीषण होता की बस खड्यात कोसळल्यानंतर पलटी होऊन तिची चाके वर झाली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करत प्रवाशांना बाहेर काढले. जखमी चालकासह काही प्रवाशांना उपचारासाठी आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातग्रस्त बसचा क्रमांक MH-14 BT 4023 असून ती भिवंडी डेपोची असल्याचे सांगण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार, बसचे स्टेअरिंग अचानक लॉक झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि बस थेट खड्यात जाऊन उलटल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने बसमध्ये प्रवाशांची संख्या अधिक होती. घटनेची माहिती मिळताच पोलिस व स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी अधिक तपास सुरू आहे.

# मराठा भवनाच्या जागेवरून नवा वाद

## "मराठा भवन समाजाच्या नावाखाली भूमाफियांचा डाव?"; नागरिकांमध्ये संताप

### परळीतील मराठा समाजाला किसने कौसा फसाया – दिपक देशमुख

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

मराठा समाजासाठी मराठा भवन उभारण्याच्या मागणीसाठी गेल्या आठ-दहा वर्षांपासून नगरपरिषदेसमोर सातत्याने आंदोलने करण्यात आली. या आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व मराठा बांधवांचे प्रथम आभार मानले जात असतानाच, आता मराठा भवनासाठी देण्यात येणाऱ्या जागेवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. काही सामाजिक कार्यकर्ते व मराठा बांधवांनी या संपूर्ण प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, "मराठा समाजाच्या भावनांचा वापर करून काही भूमाफिया व राजकीय मंडळी स्वतःचे हित साधत आहेत," असा आरोप माजी नगराध्यक्षा दिपक देशमुख यानी केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, यापूर्वी नगरपरिषदेकडून मराठा भवनासाठी इंडस्ट्रीज एरियामधील ओपन स्पेस, काळे हॉस्पिटल शेजारील जागा तसेच ब्रह्मवाडी शिवारातील सुमारे चार एकर जागा ठरावासह देण्यात आली होती. मात्र त्या जागांचा स्वीकार का करण्यात आला नाही? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

दरम्यान, आता वैद्यनाथ मंदिराच्या पाठीमागे, स्मशानभूमी लगत असलेल्या दत्त मंदिर देवस्थानच्या जमिनीबाबत कोणताही अधिकृत नगरपरिषद ठराव नसताना फक्त पत्र देऊन चतु:सीमा निश्चित करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. या जागेचा सर्वे नंबर काय? तो जाहीर करावा तसेच, स्थानिक आमदारांनी घेतलेल्या बैठकीत "नाथ प्रतिष्ठानने ही जागा दिली" असे सांगण्यात आल्याने नवीन चर्चांना उधाण आले आहे.

काही मराठा बांधवांनी सवाल उपस्थित केला आहे की, देवस्थानची जमीन शासनाची परवानगी घेतल्याशिवाय कायदेशीररित्या हस्तांतरित किंवा विक्री करता येते का? तसेच संबंधित जागा एका नगरसेवक व भूमाफियाशी संबंधित असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार हायवेच्या मध्यबिंदूपासून दोन्ही बाजूंना ७५ मीटरपर्यंत कोणतेही बांधकाम करता येत नाही. त्यामुळे संबंधित जागेवर भविष्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. "ही अडचणीची जागा नाथ प्रतिष्ठानमार्फत मराठा समाजाच्या गळ्यात मारण्याचा प्रयत्न सुरू असून, त्यामागे राजकीय वर्चस्व वाढवण्याचा हेतू आहे," असा आरोप माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख याच्याकडून करण्यात आला.

"आंदोलन नगरपरिषदेकडे जागा मागण्यासाठी झाले होते, मग ओपन स्पेस न देता नाथ प्रतिष्ठानची जागा पुढे का आणली जात आहे?" असा सवाल उपस्थित करत काही मराठा बांधवांनी समाजाने जागृत भूमिका घेण्याचे आवाहन केले आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे परळीतील राजकीय व सामाजिक वातावरण तापले असून, आगामी काळात हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सीएनजीच्या दरात पुन्हा वाढ, जाणून घ्या आजचे नवे दर

दिल्ली | वृत्तसंस्था

एनसीआरमध्ये सीएनजीच्या दरात एक रुपयाने वाढ झाली आहे. आज सकाळपासून नवीन दर प्रति किलोग्राम ₹80.09 इतका लागू झाला आहे. नवी दिल्ली. दिल्ली-एनसीआरमधील रहिवाशांना महागाईचा पुन्हा एकदा फटका बसला आहे. दिल्ली-एनसीआरमध्ये सीएनजीच्या दरात पुन्हा वाढ झाली आहे. यावेळी ही वाढ एक रुपयाची आहे दिल्ली-एनसीआरमध्ये सीएनजीचा दर आता 79.09 रुपये प्रति किलोवरून 80.09 रुपये प्रति किलो झाला आहे. हे नवीन दर रविवार सकाळपासून लागू झाले आहेत.

**■ पूर्वी झाली होती 2 रुपयांची वाढ**

हे लक्षात घेण्यासारखे आहे की, अवघ्या दोन दिवसांपूर्वीच सीएनजीच्या दरात 2 रुपयांची वाढ झाली होती. आता पुन्हा दरवाढ झाल्याने लोकांना महागाईचा दुहेरी फटका बसला आहे. ऑटो आणि कॅब चालकांना सर्वाधिक फटका सीएनजीच्या दरवाढीचा सर्वाधिक परिणाम ऑटो, कॅब आणि खाजगी वाहन चालकांवर होईल.

